Impact Factor : 1.9152 (UIF)
Volume - 3 | Issue - 9 | May– 2017

ताराबाई शिंदेनी केली स्त्रि-पुरुष तुलनेतुन स्त्री-वादाची सुरुवात

प्रा.नारायण दत्तात्रय बनसोडे
सहाय्यक प्राध्यापक, इतिहास विभाग , संतोष भिमराव पाटील महाविद्यालय, मंद्रुप.



प्रस्तावना -

१९ व्या शतकात ताराबाई शिंदे यांनी स्त्रि-पुरुष तुलना या ग्रंथाच्या माध्यमातुन हजारो वर्षापासून दबलेल्या स्त्रिच्या आवाजाला ऊर्जित अवस्था निर्माण करण्याचे काम केले. तत्कालिन सामाजिक स्थितीमध्ये स्त्रिची अवस्था आणि प्रचलित समाज मान्यतावर प्रश्नचिन्ह निर्माण करत १८८२ मध्ये ताराबाई शिंदे यांनी स्त्रि-पुरुष तुलना हे पुस्तक लिहिले आणि समाजाला जगातील सर्व स्त्रि-जातीची अवस्था याविषयी विचार विनिमय करण्याचे आवाहन केले. ताराबाई शिंदे यांचा जन्म मराठा कुणबी कुटुंबात १८५० मधे झाला. त्यांचे वडिल हरि शिंदे हे ज्योतीबा फुले यांच्या आंदोलनात सहभागी होते. सत्यशोधक समाजाचे ते अनुयायी होते. एका सुशिक्षित व विज्ञानवादी कुटुंबात ताराबाईचा जन्म झाला होता. हरि शिंदे यांनी ताराबाईस शिक्षण दिले. ताराबाईंनी मराठी, संस्कृत व इंग्रजीचे शिक्षण घेतले. पुरुषप्रधान संस्कृतीवर त्यांनी मोठी टिका केली. पुरुषापेक्षा स्त्रिया प्रामाणिक असल्याचे प्रतिपादन केले. स्त्रि-पुरुष तुलनेच्या द्वारे त्यांनी स्त्रि व पुरुष यांच्यातील वास्तविक परिस्थिती मांडली.

पुरुषप्रधान संस्कृतीवर ताराबाईचे कडवट प्रश्न :-

ताराबाईंनी स्त्रि-पुरुष समानतेवरील लेखनाद्वारे पुरुषप्रधान संस्कृतीला इशारा दिला की, स्त्रिला सामाजिक, सांस्कृतिक व धार्मिक कार्यापासून तुम्ही वेगळे ठेवू शकत नाही. लिंग भेदा आधारे स्त्रि व पुरुष यांना दिलेल्या अधिकाराविषयी त्यांनी आवाज उठविला. त्यांनी वारंवार प्रश्न केला की, पुरुष स्वतःला स्त्रियांपेक्षा वेगळे का समजतात. ते स्वतःला हुशार व बुध्दिमान का समजतात. त्यापुढे म्हणतात की, ते इतके हुशार, बुध्दिमान व पराक्रमी होते तर मग इंग्रजांनी त्यांना गुलाम कसे बनवले. पुरुषामध्ये असे कोणते वेगळेपण आहे की, आपल्या पत्नीच्या मृत्यूनंतर दु:ख होत नाही आणि लगेच दुसरे लग्न करण्यास तयार होतात. याउलट पतीच्या मृत्युनंतर मात्र स्त्रिला खुप दु:ख व त्रास दिला जातो, जसे काही तीनेच आपल्या पतीला मारले आहे. असा एक-दुसरेपणा का केला जातो. त्यांना वेगवेगळे का गणले जाते. त्या म्हणतात की, स्त्रि-पुरुष समान यौन इच्छा ठेवतात. त्यावेळी त्यांच्यात भेद नसतो. विधवांची मोठी हाल केली जात होती. त्यांना सन्मानाची वागणुक दिली जात नव्हती. म्हणुन असे विधवा म्हणुन राहण्यापेक्षा सती गेलेले बरे असे त्या म्हणत.

मुक्या स्त्रिचा पहिला आवाज ताराबाई :-

धर्म पंडितांनी आणि धर्मग्रंथानी सर्व नियम पुरुषांच्या सुख-सुविधांचा विचार करुन बनवले आहेत. स्त्रियांचा विचारच केला नाही असा आरोप ताराबाईंनी केलेला आहे. पुरुष प्रधान संस्कृतीमूळे स्त्रिचे विश्व चार भिंतीमध्ये बंदिस्त होते, बाह्य जगाशी तिचा कोणताच संबंध नाही अशा प्रकारच्या परिस्थितीमूळे स्त्रिची अवस्था वाईट झालेली आहे. याकडे ताराबाईने लक्ष वेधले. पुरुष सत्ताक संस्कृतीवर जहरी टिका करताना ताराबाई म्हणतात की, स्त्रिचे हक्क, अधिकार व स्वातंत्र्य हिरावून घेण्याचा अधिकार पुरुषांना कोणी दिला असा प्रश्न त्यांनी समाजाला विचारला. पुरुषांचे अन्यायाचे स्वरुप त्यांनी समाजासमोर आणले. त्यांनी पुरुषांना प्रश्न केला की, तुम्ही आपल्या हातात सर्व धन दौलत ठेवुन, स्त्रिला घरात दासी बनवुन तिच्यावर अधिकार व दबाव ठेवुन गुलाम केलात आणि तिच्या अंगातील सर्व चांगल्या गुणांकडे दुर्लक्ष करुन, फक्त आपल्या गुणांचा उदोउदो केलात. स्त्रिला शिक्षणापासून दुर ठेवुन अज्ञानी ठेवलात. जिथेही स्त्रि जाईल तिची मुलाखात अज्ञानी स्त्रिबरोबरच होत असे. त्यामूळे तिला जगाचे व व्यवहाराचे ज्ञान कसे मिळेल, असा सवाल केला. यामूळे ती तणावग्रस्त होती. ती आपले मत व विचार व्यक्त करत नव्हती. ती मुकी बनली होती. विधवा स्त्रिची अवस्था तर याहून वाईट होती. ताराबाई म्हणतात की, पत्नीच्या मृत्युनंतर पती दुसरा विवाह करतो तर मग पतीच्या मृत्युनंतर स्त्रिने का विवाह करु नये, अशा प्रकारे ताराबाई या मुक्या स्त्रिच्या आवाज बनल्या होत्या.

वंचित स्त्रिच्या आगतिकतेला उत्तेजित केले :-

स्त्रि पुरुषसत्ताक संस्कृतीच्या दबावाखाली दु:खी व असाह्य बनली होती, याकडे ताराबाईन लक्ष वेधले. पुरुषसत्ताक संस्कृतीच्या फाजील व निरर्थक प्रश्नामूळे स्त्रिचा आत्मसन्मान व भावना दुखावल्या गेल्या होत्या. ताराबाईंनी धर्मातील रुढी, परंपरा व वाईट चालीरितीवर टिका केली. त्यांनी प्रश्न केला की, ज्याप्रकारे तुम्हास तुमचा जीव प्रिय आहे, तसेच स्त्रिला तिचा जीव प्रिय नसणार का? तुमचा जीव सोन्याने बनला आहे व स्त्रिचा जीव लोखंडाने बनला आहे का? मग तुम्ही स्त्रिला दगड का मानता? पतीच्या मृत्युनंतर तिची अवस्था फार वाईट होते. तिचे केशवपन केले जाते, तिचे सौंदर्य नष्ट केले जाते, तिला सर्व सुख- सोईपासुन दूर ठेवले जाते. तिला सामाजिक व धार्मिक कार्यात सहभाग दिला जात नाही. तिचे तोंड पाहणेही अपशकुन मानले जाते. अशा अनेक बंधनामूळे स्त्रिची वाईट अवस्था बनली आहे. पतीचा मृत्यु झाला तर यात तिचा काय दोष असा प्रश्न त्यांनी केली. ताराबाईंनी स्त्रिची आगतिकता समाजासमोर आणली, या विविध प्रश्नाद्वारे त्यांनी स्त्रियामध्ये चेतना निर्माण केली.

पुरुषसत्ताक संस्कृती वेश्यावृत्तीला खतपाणी घालते :-

समाजात वेश्यावृत्तीचे मूळ कारण पुरुष मंडळीकडुन निर्माण केलेल नियम आहेत स्त्रि घरात गुलाम म्हणुन जीवन जगते. पतीच्या मृत्युनंतर पांढरी साडी घालण्याने केश कापल्याने तिच्या मनातील भवना नष्ट होत नसतात. त्यामूळे त्यांचे वाकडे पाऊल पडते. जर स्त्रिला पुनर्विवाहाचा अधिकार असता तर असे प्रकार घडले नसते. तुम्ही पुरुष मंडळी तुमच्या काम वासना भागवण्यासाठी अनेक विवाह करता, मग स्त्रिने काय करावे. समाजात वेश्यावृत्ती पुरुषांमूळे निर्माण झालेली आहे. स्त्रिला पतीचे प्रेम मिळल्यास ती आनंदी राहते. ती बाकीच्या सुखाचा विचार करत नाही. कोणत्याही परिस्थितीत स्त्रिच बदनाम होते, आणि परस्त्रिच्या पाठीमागे पळणारा पुरुष छाती फुगवून कर्तृत्व केल्याप्रमाणे उभा राहतो. हे सर्व त्यांचे अपराध मानले जात नाहीत. अशा प्रवृत्तीवर ताराबाईंनी जोरदार टिका केली.

खोटारड्या साधु, ढोंगी बाबावर टिका :-

संन्याशी रुप धारण करुन साधु, ढोंगी बाबांवर ताराबाईंनी जोरदार टिका केली. त्यांच्या कपटी भावना व नितीवर ताशेरे ओढले. त्या म्हणतात की, बहुरुपी बनुन तुम्ही फिरता, किती नावे दिलेत तुम्हाला? गोसावी, साधु, वैरागी, जटाधारी, दुग्धाहारी, मिताहारी, अजुन किती कोणास ठाऊक ? संन्यासाचे सोंग घेवून, स्वत:ला बाबा म्हणुन स्त्रिला लुटता. पंच पक्वांनावर ताव मारता, तुमचे कारनामे सुरु असतात. दर्शनासाठी आलेल्या सुंदर स्त्रियांविषयी कामभावना तुमच्या मनात निर्माण करता, परमेश्वराच्या जागी सुंदर स्त्रियांचा जप करता, तुम्ही कसले बाबा. गंगा स्नान केल्याने तुमच्या मनातील पापभावना नष्ट होत नाहीत. डोक्यात स्त्रिचा जप करता तपश्चर्या करता, देवासमोर पडलेले पैसे उचलुन रांडच्या घरी जाणारे तुम्ही कसले ढोंगी संन्यासी?

निष्कर्ष :

ताराबाई शिंदेंनी स्त्रि-पुरुष तुलना या पुस्तकाच्या माध्यमातुन परखड मत व्यक्त केले. पुरुषसत्ताक संस्कृतीवर जोरदार टिका केली. पुरुषांचे दुर्गुन जगासमोर आणले व पुरुषापेक्षा स्त्रिया ह्या नेहमी प्रामाणिक असतात. तरीही पुरुष शेखी मिरवतात. याकडे लक्ष वेधले. सती पध्दत, केशवपन, यामूळे स्त्रिला जीवन नकोसे वाटत होते, याला समाज व धर्मशास्त्रे जबाबदार आहेत असे मत त्यांनी मांडले. आपल्या परखड मताद्वारे त्यांनी स्त्रियांमध्ये उत्साह व चेतना निर्माण करण्याचे काम केले. स्त्रि-पुरुष वर्चस्वाखाली दबली होती ती मुकी बनली होती. स्वत:चे दु:ख व्यक्त करत नव्हती. अशा स्त्रिला बोलके करण्याचे काम ताराबाईने केले.

संदर्भग्रंथ :

१) शिंदे ताराबाई स्त्रि-पुरुष तुलना, संवाद प्रकाशन.
२) तलवार वीर भारत, स्त्रि-पुरुष तुलना
३) मालती के.एम.स्त्रि विमर्श : भारतीय परिप्रेक्ष्य
४) कोतापल्ले नागनाथ (संपादक) श्रीमती ताराबाई शिंदे लिखित स्त्रि-पुरुष तुलना.
५) जोशी, महादेवशास्त्री (संपादक) भारतीय संस्कृतिकोश पाचवा खंड.
६) पद्मजी बाबा, यमुनापर्यटन अथवा हिंदु विधवांच्या स्थितीचे निरुपण.
७) मालशे, सं.ग. (संपादक) कै.ताराबाई शिंदेकृत स्त्रि पुरुष तुलना.
८) भावे वा.कृ. पेशवेकालीन महाराष्ट्र.
९) रघुवंशी, रमेश (संपादक) कै.ताराबाई शिंदे लिखित स्त्रि पुरुष तुलना : रमेश रघुवंशी यांच्या नव्या प्रस्तावनेसह.